(सर्व कायदेशीर अथवा न्यायालयीन विवादासाठी या आदेशाचा इंग्रजी अनुवाद अधिग्राह्य धरण्यात येईल.)

वनजमिन- जळगाव

वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या बांधकामाकरीता कार्यकारी अभियंता, गिरणा कालवा नूतनीकरण विभाग क्र.२, जळगाव यांना ३९.९८ हेक्टर राखीव वनक्षेत्र वळतेकरणाबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन आदेश क्रमांकः एफएलडी-१७०९/प्र.क्र.४६२/फ-१०

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ०६/०२/२०१८

वाचा :-

१) मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/एनसी/आय/आयडी-११७८६/२२९/०९-१०, दि. ०८/०५/२००९.

२) महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभागाचे पत्र समक्रमांक, दि. २०/०६/२००९.

३) पर्यावरण व वन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम क्षेत्र, भारत सरकार, भोपाळ यांचे पत्र क्र.६-एमएचसी ०२५/२००९-बीएचओ/२६३४, दि. २७/१०/२००९.

४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.डेस्क-१७/एनसी/II/आयडी-११७८६/(२५)/१०५३/१४-१५, दि. १७/०९/२०१४.

५) पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांचे पत्र क्र.एफ.नं.६-एमएचसी-२५/२००९-बीएचओ/४७८, दि. १९/११/२०१५.

६) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१७/नोसेल/आरएस-II/आयडी-११७८६/(२५)/२५०५/१७-१८, दि. २२/०१/२०१८.

आदेश :-

ज्याअर्थी, मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी कार्यकारी अभियंता, गिरणा कालवा नूतनीकरण विभाग क्र.२, जळगाव यांच्याकडून प्राप्त झालेला वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या बांधकामाकरीता जळगाव जिल्ह्यातील ३९.९८ हेक्टर राखीव वनक्षेत्र वळती करण्याचा प्रस्ताव राज्य शासनास उपरोक्त अ.क्र.१ येथील पत्रानुसार सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्प हा राज्याच्या फायद्याचा असून, त्यामुळे सर्वसाधारण जनतेला फायदा होणार आहे, म्हणजेच ही योजना एक जनहितार्थ प्रकल्प असून, भारत सरकारच्या वन (संवर्धन) अधिनियम,१९८० च्या मार्गदर्शक सूचनानुसार हा प्रकल्प स्थळ विवक्षित (site specific) आहे. तसेच या योजनेसाठी पर्यायी वनेत्तर जमिन उपलब्ध नसल्याची बाब विचारात घेण्यात आली;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने या प्रस्तावाची काळजीपूर्वक छाननी केल्यानंतर उपरोक्त अ.क्र.२ येथील पत्रानुसार वन (संवर्धन) अधिनियम, १९८० च्या कलम-२ अन्वये ३९.९८ हेक्टर राखीव वनक्षेत्र वळती करण्याची भारत सरकारला शिफारस केली आहे;

आणि ज्याअर्थी, भारत सरकारने या प्रस्तावावर नीट विचार करुन, राज्य शासनाने वन (संवर्धन), अधिनियम, १९८० च्या कलम-२ खाली सादर केलेल्या प्रस्तावास वरील अ.क्र.-३ येथील पत्रानुसार तत्वत: मंजुरी दिलेली आहे. ही मंजुरी भारत सरकारच्या दिनांक २७/१०/२००९ रोजीच्या पत्रात नमुद केलेल्या अटींची पूर्तता प्रकल्प यंत्रणा करेल याच्या अधीन राहून प्रदान केली आहे;

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-४ येथील पत्रान्वये अटी पूर्तता अहवाल पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम क्षेत्र, भारत सरकार, भोपाळ यांना सादर केला होता;

आणि ज्याअर्थी, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, क्षेत्रिय कार्यालय, पश्चिम-मध्य क्षेत्र, भारत सरकार, नागपूर यांनी जळगांव जिल्हयातील ३९.९८ हेक्टर राखीव वनक्षेत्र इतकी वनजमिन उपरोक्त प्रकल्पासाठी काही अटींसह वरील अ.क्र.-५ येथील पत्रान्वये वळती करण्यास अंतिम मान्यता दिली आहे;

आणि ज्याअर्थी, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी त्यांच्या वरील अ.क्र.-६ येथील पत्रान्वये प्रकल्प यंत्रणेने केंद्र शासनाच्या दिनांक १९/११/२०१५ रोजीच्या अंतिम मान्यता पत्रातील अटींची पूर्तता केली असल्याचे कळविले आहे;

म्हणून आता महाराष्ट्र शासन याद्वारे असे निर्देश देत आहे की, प्रकल्प प्राधिकरण म्हणजेच कार्यकारी अभियंता, गिरणा कालवा नूतनीकरण विभाग क्र.२, जळगाव यांना, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत शेळगांव बॅरेज मध्यम प्रकल्पाच्या बांधकामाकरीता मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या पत्रासह जोडलेल्या प्रकल्प प्रस्तावात अधिक तपशिलात नमुद केलेली आणि खाली दिलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेली ज्यामध्ये, राखीव वनजमिन समाविष्ट आहे, अशी एकूण ३९.९८ हेक्टर वनजमिन या प्रस्तावासाठी वळती करण्यात यावी. हे वळतीकरण भारत सरकारच्या दिनांक २७/१०/२००९ व दिनांक १९/११/२०१५ रोजीच्या पत्रांतील अटी व शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन राहून तसेच खालील अटींच्या पूर्ततेनंतर पूर्ण करण्यात यावे.

१. वर नमुद केलेल्या भारत सरकारच्या तत्वत: मान्यता व अंतिम मान्यतेच्या पत्रातील विहित केलेल्या सर्व अटींचे प्रकल्प यंत्रणा अनुपालन करेल. प्रकल्प यंत्रणा सर्व अटींचे तंतोतंत अनुपालन करेल याची मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे हे खात्री करतील. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे याबाबतचा अहवाल वेळोवेळी अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील.
२. वन (संवर्धन) अधिनियम, १९८० व त्याअंतर्गत केलेले नियम आणि मार्गदर्शक सूचना व या आदेशातील अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न करणे हे वन (संवर्धन), १९८० चा भंग ठरेल आणि त्याप्रमाणे याबाबत वैधानिक कारवाई करण्यात येईल.

३. उपरोक्त अटींपैकी कोणत्याही अटींचे अनुपालन न केल्यास (non–compliance) संबंधित उपवनसंरक्षक, वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत दिनांक २५/१०/१९९२ रोजी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनातील कलम १.९ नुसार अहवाल राज्य शासनामार्फत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर यांना सादर करतील.

अनुसूची

गावाचे नाव	तालुका	जिल्हा	सर्व्हे क्र.	क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये)	वैधानिक दर्जा
तिघ्रे	जळगाव	जळगाव	१८४ ई	३.७०	राखीव वने
			१८६	३.३२	
साकेगाव	भुसावळ		१२८/१+२ बीए	१९.९६	
सतारे	भुसावळ		७०	४.००	
बोरावल बुद्रुक	यावल		३००	४.५०	
वाघळुद	यावल		१३	२.२५	
			१४	२.२५	
एकूण क्षेत्रफळ (हेक्टर मध्ये)				**३९.९८**	**राखीव वने**

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२०६१६३६३४१४१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.02.06 16:41:35 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)

प्रत- टप्पा-१ व टप्पा-२ च्या मंजुरी आदेशासह वरील आदेश आपल्या वेबसाईटवर अपलोड करण्याच्या विनंतीसह :

१. सचिव, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
२. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (केंद्रीय), पश्चिम-मध्य क्षेत्र, पर्यावरण, वन व जलवायु परिवर्तन मंत्रालय, भारत सरकार, नागपूर.

प्रत :-

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३. प्रधान सचिव (जलसंपदा), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
७. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
८. मुख्य वनसंरक्षक (वन संवर्धन), नागपूर.
९. मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे.
१०. जिल्हाधिकारी, जळगाव.
११. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव.
१२. उप वनसंरक्षक, जळगाव.
१३. कार्यकारी अभियंता, गिरणा कालवा नूतनीकरण विभाग क्र.२, जळगाव.
१४. निवडनस्ती (फ-१०).

२. जिल्हाधिकारी, जळगाव; मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव व उप वनसंरक्षक, जळगाव यांना निर्देशित करण्यात येते की, वरील आदेशाची प्रत स्थानिक संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना पाठविण्यात यावी. तसेच त्यांनी वरील आदेश त्यांच्या कार्यालयातील सूचना फलकावर तसेच वरील कार्यालय प्रमुखांच्या सूचना फलकावर सर्वसामान्य जनतेच्या माहितीसाठी प्रदर्शिले जातील याची खात्री करावी.

३. कार्यकारी अभियंता, गिरणा कालवा नूतनीकरण विभाग क्र.२, जळगाव यांना निर्देशित करण्यात येते की, वन मंजुऱ्यांचे सर्व आदेश, सर्व्हे क्र., गट क्र. त्यांचे प्रत्येकाचे क्षेत्र आणि वैधानिक दर्जा इ. सह आणि केंद्र शासनाने मान्यतेच्या आदेशात घातलेल्या अटी व संरक्षित बाबी यांच्यासह एक स्थानिक भाषेतील व एक इंग्रजी भाषेतील प्रसिध्द अशा दोन दैनिक वृत्तपत्रात प्रसारित करावेत, व त्याची प्रत मुख्य वनसंरक्षक (प्रा.), धुळे व उपवनसंरक्षक, जळगाव यांना पाठवावी.

४. स्थानिक स्वराज्य संस्था, पंचायत, नगरपालिका, नगरपरिषद आणि संबंधित शासकीय कार्यालयांचे प्रमुख यांना निर्देशित करण्यात येते की, आदेशांची प्रत मिळाल्यापासून ३० दिवसापर्यंत सदर आदेश सूचना फलकावर प्रदर्शित करावेत.

<u>Forest Land- Jalgaon</u>
Diversion of 39.98 Ha. of Reserved forest land for construction of Shelgaon Barrage Medium Project in favour of Executive Engineer, Girna Canal Modernisation Division No.2, Jalgaon under Forest (Conservation) Act, 1980.

Government of Maharashtra

Revenue and Forest Department

Government Order No. FLD-1709/ C.R.-462/ F-10

Mantralaya, Mumbai-400 032.

Date: 06/02/2018

<u>Read:-</u>

1) Letter from Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/I/I.D.-11786/229/09-10, dated 08/05/2009.
2) Letter from Government of Maharashtra of even no., dated 20/06/2009.
3) Letter from Ministry of Environment & Forests, Western Region, Government of India, Bhopal No. 6-MHC 025/ 2009-BHO/ 2634, dated 27/10/2009.
4) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/NC/II/I.D.-11786/(25)/1053/14-15, dated 17/09/2014.
5) Letter from Ministry of Environment, Forests & Climate Change, Regional Office, West-Central Zone, Government of India, Nagpur F. No. 6-MHC-25/2009-BHO/478, dated 19/11/2015.
6) Letter from Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, No.Desk-17/Nocell/RS-II/ID-11786/(25)/2505/17-18, dated 22/01/2018.

<u>Order:-</u>

Whereas, the Chief Conservator of Forests & Nodal Officer Maharashtra State, Nagpur, vide his letter referred at sr. no. 1 above has submitted a proposal which has been received from Executive Engineer, Girna Canal Modernisation Division No.2, Jalgaon for Diversion of 39.98 Ha. of Reserved forest land for construction of Shelgaon Barrage Medium Project, District-Jalgaon under Forest (Conservation) Act, 1980 to the State Government;

AND whereas, Shelgaon Barrage Medium Project is for the benefit of the general public of the State. Hence it is, in other words, a project is of public importance and as per Government of India, Forest (Conservation) Act, 1980 guidelines the project is site specific and non availability of alternative non-forest land for the project was considered;

AND whereas, Government of Maharashtra after careful scrutiny and consideration, vide its letter referred at sr. no. 2 above has recommended it to the

Government of India to divert the 39.98 Ha. of Reserved forest land for the above project under section 2 of Forest (Conservation) Act, 1980;

AND whereas, Government of India after due consideration, vide its letter referred at sr. no. 3 above granted in-principle approval to above proposal submitted by Government of Maharashtra for diversion of forest land under section 2 of Forest (Conservation) Act, 1980. The said approval is subject to fulfillment of certain conditions by the User Agency mentioned in its letter dated 17/09/2014;

AND whereas, Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide its letter referred at sr. no. 4 above has submitted compliance of those conditions to the Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, Western Zone, Bhopal;

AND whereas, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, West-Central Zone, Nagpur accorded final approval under section 2 of forest (Conservation) Act, 1980, for the purpose of above proposal from the Executive Engineer, Girna Canal Modernisation Division No.2, Jalgaon for the Diversion of 39.98 Ha. of Reserved forest land for construction of Shelgaon Barrage Medium Project, District-Jalgaon with certain conditions, vide its letter referred at sr. no. 5 above;

AND whereas, the Additional Principal Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur, vide its letter referred at serial number 6 above has conveyed that, User agency has complied with all the conditions stipulated in Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, West-Central Zone, Nagpur's letter of formal approval dated 19/11/2015;

NOW, therefore, Government of Maharashtra hereby directs that the forest land area of 39.98 Ha. consisting of Reserved forest more specifically described in the proposal submitted, vide letter mentioned at sr. no.-1 here in above from Chief Conservator of Forests & Nodal Officer, Maharashtra State, Nagpur and as per details given in the Schedule given below, be diverted to the User Agency, i. e. Executive Engineer, Girna Canal Modernisation Division No.2, Jalgaon for construction of Shelgaon Barrage Medium Project, District-Jalgaon. The diversion shall be effected subject to the terms and conditions mentioned in the letter dated 17/09/2014 & dated 19/11/2015 of Government of India. This approval for diversion of forest land is also subject to compliance of following conditions by the User Agency-

1. The User Agency shall comply with all the conditions stipulated in the in-principle and final approval letters of Government of India, referred above. The Chief Conservator of Forest (Territorial), Dhule shall ensure the strict compliance of the conditions by the Project Authority. CCF (T) will furnish the report in this regard to Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur from time to time.

2. Non-compliance of any of the conditions mentioned in this order and Rules and Guidelines made / issued under Forest (Conservation) Act, 1980, shall amount to violation of Forest (Conservation) Act, 1980 and action would be taken accordingly.
3. In case of non-compliance of any of the above conditions, the concerned Deputy Conservator of Forests shall report through the State Govt. to Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, West-Central Zone, Nagpur as per procedure laid down in the clause 1.9 of guidelines on 25/10/1992 under the Forest (Conservation) Act, 1980.

SCHEDULE

Village Name	Tehsil	District	Survey No.	Area (in Ha.)	Legal Status
Thighre	Jalgaon	Jalgaon	184 E	3.70	Reserved Forest
			186	3.32	
Sakegaon	Bhusawal		128/1+2 ba	19.96	
Satare	Bhusawal		70	4.00	
Borawal Bk.	Yawal		300	4.50	
Waghlud	Yawal		13	2.25	
			14	2.25	
Total Area in Hectares				**39.98**	**Reserved Forest**

This Government Order of Maharashtra Government is available on its website www.maharashtra.gov.in. Reference no. for this is 201802061636341419. This order has been signed digitally.

By order and in the name of the Governor of Maharashtra.

Virendra R Tiwari

Digitally signed by Virendra R Tiwari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue And Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a95e1a9759002ee190cd79464daaba7dc840ec375cd62a646a64986631086810, cn=Virendra R Tiwari
Date: 2018.02.06 16:41:54 +05'30'

(Virendra Tiwari)

Chief Conservator of Forests (Mantralaya)

Copy forwarded with request to upload this order on their website along with the Stage-I and Stage-II clearances to:

1. Secretary, Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, New Delhi.
2. Additional Principal Chief Conservator of Forests (Central), Ministry of Environment, Forests & Climate Change, Government of India, Regional Office, West-Central Zone, Nagpur.

Copy to:-

1. Principal Chief Conservator of Forests (HoFF), Maharashtra State, Nagpur
2. Principal Chief Conservator of Forests (Wildlife), Maharashtra State, Nagpur
3. Principal Secretary, Water Resources Department, Mantralaya, Mumbai
4. Principal Secretary, Tribal Development Department, Mantralaya, Mumbai
5. Additional Principal Chief Conservator of Forests and Nodal Officer, Maharashtra State, Nagpur.
6. Additional Principal Chief Conservator of Forests (CAMPA), Maharashtra State, Nagpur.
7. Additional Principal Chief Conservator of Forests (Conservation), Maharashtra State, Nagpur.
8. Chief Conservator of Forests (Forest Conservation), Nagpur.
9. Chief Conservator of Forests (Territorial), Dhule.
10. Collector, Jalgaon.
11. Chief Executive Officer, Zilla Parishad, Jalgaon.
12. Deputy Conservator of Forests, Jalgaon.
13. Executive Engineer, Girna Canal Modernisation Division No.2, Jalgaon
14. Select File, Desk F-10.

2. Collector, Jalgaon; Chief Executive Officer, Zilla Parishad, Jalgaon and Deputy Conservator of Forests, Jalgaon are hereby directed to forward the copy of this order to concerned Heads of Local Bodies, Panchayats, Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government and they shall also ensure the display of this order on their notice board as well as on the notice board of local self government bodies for the information of general public.

3. Executive Engineer, Girna Canal Modernisation Division No.2, Jalgaon is hereby directed that he should publish the entire order of forest clearances granted in verbatim along with the details of Survey No., Gut No., area and legal status of each Survey, Gut No. etc. and along with the conditions and safe guards imposed by the Central Government while granting forest clearances in two widely circulated daily newspapers, one in vernacular language and other in English language. Copy of the Newspapers be submitted to Chief Conservator of Forests (Territorial), Dhule & Deputy Conservator of Forests, Jalgaon.

4. Heads of Local Bodies, Panchayats and Municipal Bodies in addition to the relevant offices of the Government are hereby directed to display the same on their notice board for 30 days from the date of receipt for the information of general public.